# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४९९८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०.


**महत्वाचे**

क्र. मुमाआ-२०२५/प्र.क्र. २० /०१ दिनांक: २०/०३/२०२५

मध्यवर्ती टपाल केंद्र, मंत्रालय,
मुख्य सचिव कार्यालय (सा.प्र.वि)
24 MAR 2025
स्वाक्षरी:-

प्रति,
मा. मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

विषय : प्रथम अपिलाच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारींना सूचना देण्याबाबत.

महोदया,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१) अन्वये केल्या जाणाऱ्या प्रथम अपिलाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभाग तसेच त्यांचे अधिनस्त सर्व प्राधिकरणांना खालील सूचना देण्यात याव्यात, असे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश आहेत.:-

अ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१) अन्वये केल्या जाणाऱ्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून निर्गमित केल्या जाणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली अथवा नाही याचा पाठपुरावा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी करणे अपेक्षित आहे.

आ) अपिलार्थींनी प्रथम अपिलामध्ये Virtual/Online सुनावणी घेण्याची मागणी केली असता प्रथम अपिलीय अधिकारी अपिलार्थीस सुनावणीकरिता प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबाबत कळवितात, असे राज्य माहिती आयोगाच्या निदर्शनास आले आहे. सदर बाब योग्य नसून अपिलार्थींनी Virtual/Online सुनावणीची मागणी केल्यास प्रथम अपिलीय अधिकारी यांनी Online सुनावणी घेणे बंधनकारक आहे.

इ) अपिलार्थींनी सादर केलेल्या प्रथम अपिल अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित कालमर्यादेत कार्यवाही केली जात नसल्याचे राज्य माहिती आयोगाच्या निदर्शनास आले आहे. तथापि, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित कालावधीत प्रथम अपील निकाली काढणे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांस बंधनकारक आहे.

ई) प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असल्यास उपलब्ध कागदपत्र आणि गुणवत्तेच्या आधारे प्रथम अपील आदेश पारित करण्यात यावेत.

उ) मा. आमदार/मा. खासदार निधीअंतर्गत खर्च करण्यात आलेल्या निधीसंदर्भातील प्रशासकीय आदेश संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याबाबत मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या दिनांक ३०/०१/२०१७ च्या द्वितीय अपील आदेशान्वये देण्यात आले आहेत. (प्रत सोबत जोडली आहे).

Scanned with CamScanner

तथापि. सदर आदेशाची अंमलबजावणी जिल्हाधिकारी यांच्यातर्फे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर आदेशाचे पालन होण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना शासन स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

सदर पत्र मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपली,

(सविता जावळे)
सचिव
राज्य मुख्य माहिती आयोग, मुंबई.

प्रत: संग्रहार्थ.

ISSUED
Date : 20-03-2025
Signature ............

Scanned with CamScanner